# शैक्षणिक सहल : लोकनेते बाळासाहेब देसाई कृषी महाविदयालयाची शैक्षणिक सहल

लोकनेते बाळासाहेब देसाई कृषी महाविदयालय दौलतनगर येथील प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यानी दिक्षारंभ कार्यक्रमांतर्गत शुक्रवार दिनांक २५.१०.२०२४ रोजी राजर्षी छत्रपती शाहू महाराज कृषी महाविदयालय कोल्हापूर येथे पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विभाग, कीटकशास्त्र विभाग, रोगशास्त्र विभाग, रेशीम उद्योग विभाग, उद्यानविद्या विभाग, कृषी विस्तार विभाग इत्यादि विभागांना भेट देवून तेथील माहिती घेतली. महाविद्यालयातील डॉ.पतंगे सर, डॉ. बागडे सर, डॉ. कोलगने सर यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले.

त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांनी राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचा राजवाडा व वस्तुसंग्रहालयास भेट दिली. तसेच महाराष्ट्रातील साडे तीन शक्ती पीठांपैकी एक श्री. महालक्ष्मी मंदिर कोल्हापूर येथे दर्शन घेवून शैक्षणिक सहलीची सांगता झाली. गुणवत्तापुरक शैक्षणिक सहलीसाठी  संस्थेचे आधारस्तंभ व मार्गदर्शक मा. शंभूराज देसाई साहेब राज्य उत्पादन शुल्क मंत्री महाराष्ट्र तथा सातारा व ठाणे जिल्हा पालकमंत्री , मा. श्री.रविराज देसाई दादा अध्यक्ष-मोरणा शिक्षण प्रसारक मंडळ मरळी, मा. श्री यशराज देसाई चेअरमन - लोकनेते बाळासाहेब देसाई सह. साखर कारखाना लि.दौलतनगर यांचे मार्गदर्शन लाभले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एम. शिंदे सर व प्रा.एस.के.लांडगे, प्रा. एस.ए.पटेल, प्रा.एस.व्ही.नेवसे यांनी शैक्षणिक सहल यशस्वीरीत्या पार पडण्यासाठी योगदान दिले.